# राजर्षी शाहू महाराज यांचे जलव्यवस्थापन

**डॉ. एस. डी. सूर्यवंशी,** डी.ए.बी.एन. आर्ट्स अँड सायन्स कॉलेज चिखली ता. शिराळा जिल्हा- सांगली

Email id : sdsuryavanshi68@gmail.com

---

**गोषवारा**

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत राजर्षी शाहू महाराजांचा बहुमोल वाटा आहे एक प्रजाहितदक्ष लोककल्याणकारी व बहुजन समाजाचा उद्धार करणारा राजा म्हणून देशात त्यांना मानाचे स्थान आहे. आपल्या प्रजेच्या सर्वांगीण उन्नतीसाठी शिक्षणाचा प्रसार, कलाक्रीडांना प्रोत्साहन, जाती भेद निवारण, आंतरजातीय विवाह, शेती, व्यापार व उद्योग उत्तेजन, पाणी व्यवस्थापन, सामाजिक सुधारणा इत्यादी अनेक विधायक सुधारणा कोल्हापूर संस्थानात घडवून आणण्यात महाराज आघाडीवर होते. शाहू महाराजांचा २ एप्रिल १८९४ रोजी वयाच्या विसाव्या वर्षी संस्थानाची अधिकार सूत्रे छत्रपती म्हणून हाती आली आणि तेव्हापासून सहा मे १९२२ रोजी त्यांचे निधनापर्यंतच्या आपल्या एकूण २८ वर्षाच्या या राज्यकारभार काळात पूर्वानुभव निरीक्षण व दूरदृष्टीने कृती करून कोल्हापूर संस्थानात त्यांनी नावलौकिक मिळवून दिला. संस्थानात सण १८९४ ते १९२२ या शाहू महाराजांच्या राज्यकारभार काळात पडलेल्या दुष्काळांचा तत्कालीन समाज व्यवस्थेवर झालेला परिणाम व त्या अनुषंगाने शाहू महाराजांनी केलेल्या कार्यांपैकी प्रामुख्याने राज्याचे प्रमुख उत्पन्न असलेले शेती आणि पर्यायाने जल या दोन महत्त्वाच्या जीवनावश्यक घटकांचा विकास संवर्धन व नियोजनासाठी केलेले कार्य याचा अभ्यास प्रस्तुत संशोधन पेपर मध्ये करण्यात आला आहे.

**प्रस्तावना**

एखाद्या संकटाचे संधीत कसे रूपांतर करावे, हे शाहू महाराजांच्या अनेक उपक्रमशील कार्यातून यथार्थपणे दिसून येते. दुष्काळाचे संकट हेच भविष्यातील जलकार्यासाठी संधी बनून महाराजांना दिशादर्शक ठरले. दुष्काळात तत्कालीन तातडीने करावयाच्या उपाययोजनांमुळे जनजीवन स्थिर होण्यास मदत झाली होती. संस्थानाची पाण्याची तहान भागवण्यासाठी उपलब्ध असलेल्या विविध जलस्रोतांचा उपयोग करून जलजाळे निर्माण करणे हाच पर्याय असल्याचे महाराजांनी ओळखले होते. पावसाचे पाणी साठवण्यासह वाहते पाणी जमिनीत मुरवून भूजल पातळी वाढवण्यासारखी जलनियोजनाचे अनेक उपक्रम त्यांनी हाती घेतले.

महाराजांनी संस्थानात दुष्काळ निर्मुलनासाठी ज्या दीर्घमुदतीच्या योजना आखल्या त्यात जलव्यवस्थापनविषयी घेतलेल्या निर्णयांचा फार मोठा वाटा आहे. त्यातूनच शेती विकास व इतर पूरक विकास झालेला पहावयास मिळतो.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. जलव्यवस्थापनविषयी शाहू महाराजांचा असलेला दृष्टिकोन आणि त्याने केलेल्या तत्कालीन उपाय व सुधारणा यांचा आढावा घेणे.

२. जलव्यवस्थापनविषयी राबवलेल्या दीर्घकालीन धोरणांचा अभ्यास करणे.

३. जल व्यवस्थापनासाठी महाराजांनी राबवलेले धोरणे व केलेले उपाय यांचा चिकित्सक अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधन लेख हा दुय्यम सामग्रीवर आधारित आहे. संशोधन लेखातील माहिती ही विविध पुस्तके, मासिके आणि इंटरनेट बेबसाईट द्वारे मिळविली आहे.

**शाहू महाराज कालीन कोल्हापूर संस्थानातील दुष्काळ**

शाहू महाराजांनी कोल्हापूर राज्यकारभाराचा पदभार स्वीकारला त्याच काळादरम्यान संस्थानातील प्रजा तीव्र दुष्काळाच्या खाईत हरपली होती। बहुसंख्य नागरिकांची उपजीविका शेतीवर असल्याने शेती क्षेत्राची उत्पादकता वाढणे आवश्यक होते मात्र दुष्काळी स्थितीमुळे शेती आणि शेतीपूरक व्यवसायावर अवलंबून असलेल्यांचा रोजगार आणि अन्नसुरक्षा धोक्यात येऊन त्यांना उपासमारीला सामोरे जावे लागत होते त्याहून वाईट स्थिती शेतकऱ्यांकडे पशुधन आणि वन्य जीवांची होती. शाहू महाराज यांनी कोल्हापूर संस्थानात पडलेल्या दुष्काळाची पाहणी करण्यासाठी दौरा आयोजित केले होते. व्यक्तिशः दुष्काळ पडलेल्या भागात भेट देऊन शाहू महाराजांनी तेथील परिस्थिती प्रत्यक्षात अनुभवली त्यांनी लोकांसमोर जाऊन त्यांच्याशी चर्चा करून यातून बाहेर काढण्याची आश्वासन दिले व दुष्काळ निवारणासाठी कृती आराखडा तयार केला.

**शाहू महाराजांच्या काळात असलेले पाण्याची व्यवस्था**

कोल्हापूर संस्थानातही इतर भागांमध्ये असते तसे गावांना नद्या व तलावातून पाणी मिळत असे. कोल्हापूर शहरातील कात्यायनी देवीच्या मंदिराजवळ पाण्याचे कुंड नैसर्गिक झऱ्यामुळे नेहमी भरलेले असायचे. ते कुंडातील पाणी कळंबा तलावात आणून सोडले जायचे .मातीचा बांध घालून पाणी अडवून ते पाणी 'पाण्याचा खजिना' या ठिकाणी साठवले जाई. नंतर या

साठ्यातून शहराला व जवळपासच्या विहिरींना पाणी पुरवठा केला जायचा. हे पाणी पिण्यासह शेती व इतर कामांसाठी उपयोगी पडत असे. शिवाय कळंबा तलावाचे पाणलोट क्षेत्र विशाल असल्याने त्यात पावसाच्या पाण्याचाही तितकाच भरणा होत होता. त्यामुळे या पाण्याचा वापर शेतीच्या सिंचनासाठी होत होता. संस्थानातील जलस्रोतांमध्ये पंचगंगा, वारणा, हिरण्यकेशी व वेदगंगा या मुख्य नद्यांचा समावेश होता. भोगावती, कुंभी कासारी, तुळशी, धामणी या पाच उपनद्या शहराच्या आसपासच्या भागातून वाहत असल्याने त्यातून त्याभागाला पाणी मिळत असे. रंकाळे, पद्माळे, सिदाळे, पेटाळे, रावणेश्वर, सुरुडतलाव, महारतळे, साकोली तलाव, फिरंगाई इत्यादी तलाव आणि कोटीतीर्थ, कपिलतिर्थ सारखे छोटी तीर्थे ही पाणीपुरवठ्याची साधने होती. या शिवाय गावागांवात अनेक ठिकाणी असलेल्या विहिरी पाण्याचा महत्त्वाचा स्त्रोत होता. शेतीसाठी या पाण्याचा वापर होत असे. बहुतेक वेळा या त्या गावातील नद्यांवर मातीचे बांध घालून तयार झालेल्या जलसाठ्याचा वापर शेतीसाठी केला जाई.

**शाहू महाराजांचे जलव्यवस्थापनाबद्दलचे नियोजन**

संस्थानातील पाणी समस्या सोडवण्यासाठी पाणी साठ्याची क्षमता वाढवणे गरजेचे होते. यासाठी शाहू महाराजांनी अल्प व मध्यम मुदतीच्या योजनांमधून काही आदेश देऊन नदीकाठी व गावांमधील विहिरींचे नाल्यांचे खोदकामाचे आदेश दिले त्यासाठी आवश्यक तो निधी त्यांनी संस्थानामार्फत उपलब्ध करून दिला त्यातून गावोगावी विहिरी खोदण्याचे काम सुरू करण्यात आले. नवीन विहिरी खोदण्यासोबतच जुन्या विहिरींचे बांधकाम करण्यास व दुरुस्त करून त्या अधिक पाणीसाठ्याच्या दृष्टीने खोल करण्यात आल्या. विहिरीतील व तलावातील गाळ काढण्याचे काम हे त्या काळात करण्यात आले हे सर्व करताना लोकांचाही सहभाग असला पाहिजे असे शाहू महाराजांची मत होते आणि लोकांनीही तितकाच प्रतिसाद देऊन श्रमदानाचे सहकार्य केले. शाहू महाराजांनी पाणीसाठा वाढवण्यासाठी अनेक गावांमध्ये विहिरी तलाव यांची देखभाल व दुरुस्ती केली. या कामांमधून पाण्याचा प्रश्न तात्पुरता सोडवण्यात यश मिळवले परंतु पाणीटंचाई समस्या कायमस्वरूपी दूर व्हावी व पुरेसा पाणीसाठा उपलब्ध व्हावा यासाठी महाराजांनी स्वतंत्र विभाग स्थापन करून त्यास स्वतंत्र अधिकारी नेमून दीर्घकालीन योजनाही राबवल्या.

**स्वतंत्र पाटबंधारे खाते**

राज्याच्या सार्वजनिक बांधकाम खात्यांतर्गत पाटबंधाऱ्याची कामे होत असत. तथापि, छत्रपती शाहू महाराजांनी दुष्काळ काळात पाण्याच्या नियोजनासाठी ज्याप्रकारे पाटबंधाऱ्यासंबंधीत कामे सुरू केली. त्यातून त्यांना अशा कामांचा मोठा आवाका व त्याचे महत्त्व लक्षात आले होते. यातूनच त्यांनी एक अभूतपूर्व व दूरगामी परिणाम करणारा निर्णय घेतला. सन १९०२ साली त्यांनी सार्वजनिक बांधकामामधून पाटबंधारे (इरीगेशन) विभाग वेगळा काढून त्याची स्वतंत्रपणे कार्यप्रणाली चालू केली.

**इरीगेशन ऑफिसर**

स्वतंत्र पाटबंधारे खाते निर्माण करण्यामागचा उद्देश त्यांनी विचारपूर्वक घेतला होता. कोल्हापूर संस्थानातील दुष्काळाला प्रतिबंध करण्यासाठी या पाटबंधारे कामाचा चांगलाच उपयोग झाल्याचे दिसले होते. व त्यातून मोठी तळी- विहिरी यांची कामे सुरू झालेली होती. या सर्व कामांचा इरिगेशनसाठी पुढे चांगला फायदा व्हावा व त्या कामांवर स्वतंत्रपणे देखरेख व्हावी आणि त्या विभागाला स्वतंत्रपणे काम करण्याची मुभा मिळेल हाच हेतू यामागे होता. या स्वतंत्रपणे काम करणाऱ्या खात्यावर तेवढेच सक्षम नेतृत्व असणेही आवश्यक होते. यामुळे त्यांनी आपल्या जाहिरनाम्यातच पहिले इरिगेशन ऑफिसर म्हणून मि. शंकर सिताराम गुप्ते या सिंचनाच्या ज्ञानात पारंगत असलेल्या अधिकाऱ्याची नेमणूक केल्याचे जाहिर केले.

**तलावा बाबत उपाययोजना**

संस्थानात सरकार खात्यामार्फत विविध ठिकाणी पाणीसाठा वाढावा व असलेला पाणी स्त्रोत अधिक क्षमतेचा होऊन भविष्यकाळातील पाण्याची समस्या येऊ नये म्हणून प्राथमिक स्तरावर काही उपाय केले गेले. संस्थानात तलावांची दुरुस्ती करण्यात आली त्यासाठी संस्थानाने खर्च केला. तलावातील गाळ काढून त्यातील तो गाळ शेतकऱ्यांना दिला तो गाळ शेतकऱ्यांसाठी उपयोगी झाला लोकांना मोफत गाळ काढून नेण्यासाठी मंजुरी दिलेली होती.

कोल्हापूर शहरातील रंकाळे वरून तीर्थ कळंबे यासारख्या तलावांचा गाळ काढण्यात आला. पन्हाळा भागातील सोमाय तलावातील गाळ काढून एक विहीर सुद्धा बांधण्यात आली कोल्हापूर शहरातील कोटी तीर्थ तलावाला बांध घालून पाण्याची सोय केली मुडशिंगे येथील तलावाची दुरुस्ती करण्यात आली वडगाव रुकडी शिरोळ येथे नवीन तलाव बांधण्यात आला सातवे व जोतिबा डोंगर या भागातील तलाव दुरुस्त करून घेतला यासाठी लागणारा पैसा शाहू महाराजांनी मंजूर करून त्या त्या भागातील पाणी प्रश्न सोडवण्यास मदत केली.

**तलावाचे पाणी स्वच्छ ठेवणे**

कॉलरा हा साथीचा रोग पाण्यातून पसरणारा होता संस्थानात बऱ्याचदा यात्रा जत्रांच्या वेळी लोकांची सामूहिक गर्दी होत असते त्याच्या वापराने येथील परिसर व पाणी लगेचच खराब होण्यास सुरुवात होते आणि याचमुळे साथ लवकर पसरते महाराजांनी चिंचोलीच्या यात्रेतून आलेल्या अनुभवातून सार्वजनिक ठिकाणी शक्यतो एकत्र येण्यावर बंधने घातली पण असा

प्रकार जोतिबाच्या यात्रेत होऊ नये म्हणून सन १९१२ ला भरणाऱ्या चैत्र पौर्णिमेच्या यात्रे अगोदरच तेथील गायमुख तलावाचे पाणी स्वच्छ ठेवण्याचा सूचना दिल्या व स्वतंत्र कर्मचारी लावून नेहमीच तेथील साफसफाई करत राहण्याची सक्त ताकीद दिली होती जेणेकरून सातीस प्रतिबंध होईल.

**पाण्यात औषधी द्रव्य फवारणी**

कॉलरावर सर्व साधारणपणे पाणी स्वच्छता हा उत्तम उपाय असल्याने गावातील नदीचे पाणी औषधी द्रव्याने स्वच्छ करण्याचा आदेश देऊन त्याच्या खर्चाची तरतूद ही मुनीपल फंडातून केली गेली

**तलावाचे पाणी गावापर्यंत नेण्याची योजना**

शाहू महाराजांनी जनतेला पाणी मिळावे यासाठी विविध प्रयत्न केलेले आढळतात. याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे गायमुख तलावातील पाणी हे सोनतळी व कुशीरे या गावापर्यंत नेण्याचे ठरविले होते. त्यासाठी एकूण ९०० रूपयांचा खर्च होता, पण गावमदतीतून रू. ६०० मिळणार होते व उर्वरीत ३०० रु. ची मागणी सरकारात केली होती, पण पाण्यासाठी लोकांची सोय होत आहे. हे बघून महाराजांच्या आज्ञेने पूर्ण ९०० रूपयांची रक्कम सरकारातून दिली गेली. त्याचप्रमाणे रुकडी गावातसुद्धा ४ इंची नळीने पाणी आणण्याचे काम तातडीने करावे आणि तोपर्यंत वडगाव गावाजवळ पाण्याची जशी सोय केली, तशीच येथेही तात्पुरत्या स्वरूपात पाणी उपलब्ध करून द्यावेत, असा आदेश महाराजांनी काढला.

**राधानगरी धरण (लक्ष्मी तलाव)**

लक्ष्मी तलाव हा भोगावती नदीवर बांधण्यात आलेले मोठे धरण (राधानगरी धरण) हे शाहू महाराजांच्या जीवनाचे एक ध्येय होते. शाहू महाराज यांच्या पत्नी लक्ष्मीबाई यांच्या शुभहस्ते १९०९ साली धरणाचा पाया खुदाई समारंभ झाला. राधानगरी धरणावर प्रतिवर्षी सरासरी २७६६ मजूर काम करीत होते १९१७ पर्यंत धरणाचे बांधकाम ४३८७०८८ घनफूट झालेले होते तर १३३६१३० रुपये एवढा प्रचंड खर्च झालेला होता दुर्दैवाने शाहू महाराजांच्या काळात नंतर धरणाचे बांधकाम सुरू होऊ शकले नाही परंतु आपल्या वडिलांचे हे स्वप्न राजाराम छत्रपती यांनी १९५७ साली धरणाचे बांधकाम पूर्ण करून केले या धरणामुळेच आज कोल्हापूर जिल्ह्यात हरितक्रांती झालेली दिसून येते त्याचे मूळ मात्र शाहू महाराजांच्या विचारात व कृतीत होते.

राधानगरी धरण ही महाराजांची महत्त्वाकांक्षी योजना असल्याने त्यांनी वेळोवेळी त्यावर लागेल तेवढा खर्च केलेला होता. त्यातील काही खर्चाच्या बाबी बघता हे संस्थानातील सर्वात मोठे धरण असल्याची सहज कल्पना येते.

**सारांश**

महाराजांच्या सूक्ष्म निरीक्षणाच्या सवयीने त्यांनी बाहेरील देशांमधील प्रगती बघितली होती. मर्यादीत पाण्याचा योग्य प्रकारे वापर करून त्यांनी अन्नधान्याबाबत जी स्वयंपूर्तता प्राप्त केली होती, त्यामुळे त्यांच्या देशात सुबत्ता येऊन इतरही क्षेत्रात आधुनिकीकरण व्हायला मदत झाली होती. शाहू महाराजांना तिथे आपल्या संस्थानाच्या भविष्यातील प्रगतीसाठीची वाट मिळाली. दुष्काळ रूपात संधी शोधून त्यांनी तातडीने प्रथम पाण्याच्या संदर्भाने जे काही निर्णय घेतले, त्यातून पुढे राज्यात हरितक्रांतीला मदत तर झालीच, पण हे राज्य जलस्वयंपूर्ण होत गेले. त्यावेळच्या इतर संस्थानांपेक्षा कोल्हापूरचे हेच वेगळेपण उठून दिसत होते. कोल्हापूर संस्थानात दीर्घकालीन कामांमधून राधानगरीसारखे मोठं धरण प्रकल्प जरी राबविले, तरी राज्याच्या कानाकोपऱ्यातील भागांमध्ये पाण्याची व्यवस्था बळकट होईल, असे निर्णय घेतले. एवढेच नाही तर पाण्याची निगा राखण्याचे व पाण्याचा अनावश्यक अपव्यय होणार नाही, यासाठी कडक कायदे ही केले. पर्यावरण व पाऊस यांचे नाते बघता त्याचे रक्षण व वाढ यावर महाराजांनी लक्ष केंद्रीत करून संवर्धनाचे आदेशही दिले होते. या सर्वाचा परिणाम संस्थानातील अनेक ठिकाणी पाण्याच्या पातळीत वाढ होण्यावर झाला.

**संदर्भ**

१. **पाटील शामराव आणि धाटावकर भास्कर (१९८८)** राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, भाग एक, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

२. **पवार जयसिंग (२०१४)** राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर

३. **जाधव रमेश (२०१६)** राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य

४. **पाटील जे एफ (२००५)** आर्थिक विचारांचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर

५. **पवार जे के (२०१८)** राजर्षी शाहूंची अर्थनीती, राज प्रकाशन, कोल्हापूर

६. **कुलकर्णी मीना (१९७५)** श्री शाहू छत्रपतींचे अर्थकारण, गौरीनंदन प्रकाशन, कोल्हापूर

७. **कीर धनंजय (२०१६)** राजर्षी शाहू छत्रपती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

८. **कोडतीकर सुरेश (२०१६)** लोक कल्याणकारी राजर्षी शाहू महाराज, यशोदीप पब्लिकेशन, पुणे

९. रिपोर्ट ऑफ द जनरल ऍडमिनिस्ट्रेशन ऑफ द कोल्हापूर १८९६ ते १९१९